# आशेच्या पंखानी घ्या झेप प्रगतीची!

## मुलींसाठी शैक्षणिक शिष्यवृत्ती



डॉ. रमेश तैनवाला (सी.ई.ओ.,सॅम्सोनाईट कार्पोरेशन) आणि सौ.शोभा तैनवाला यांनी सन २०१३ साली नाशिकमध्ये तैनवाला फाऊंडेशन ह्या सेवाभावी संस्थेची स्थापना केली. या संस्थेमार्फत पर्यावरणाच्या समतोलाकरिता आणि हरित नाशिक संकल्पनेला धरुन वृक्ष लागवडीचे उपक्रम, गरजू मुलींच्या उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना, पिण्याचे पाणी आणि स्वच्छता यांसारख्या समाजहिताच्या प्रश्नांवर काम केले जाते. आर्थिक परिस्थितीमुळे ज्या हुशार आणि शिक्षणाची आवड असलेल्या विद्यार्थीनींना शिक्षण पूर्ण करता येत नाही अशा २५ गरजू विद्यार्थीनींच्या १२ वी नंतरच्या उच्च शिक्षणासाठी तैनवाला फाऊंडेशन दरवर्षी रु. १ लाख इतकी रक्कम शिष्यवृत्ती स्वरुपात देण्यात येते. या शिष्यवृत्तीचा लाभ घेत आजवर ४६ विद्यार्थिनी त्यांचे उच्च शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करत आहेत. या शैक्षणिक वर्षात २०१६–२०१७ देखील गरजू विद्यार्थीनींना तैनवाला फाऊंडेशनतर्फे रु. १ लाख इतकी रक्कम उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती स्वरुपात दिली जाणार असून इच्छूक व गरजू विद्यार्थिनींकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

**तैनवाला फाऊंडेशन**

### पात्रता अटी :

- १२ वीत किमान ८०% व त्यापेक्षा अधिक गुण असणे अनिवार्य.
- कुटुंबाचे एकूण कमाल वार्षिक उत्पन्न ३ लाखांहून अधिक नसावे.
- विद्यार्थिनी व कुटुंबीय नाशिकचे स्थायी रहिवासी असावेत. नाशिक जिल्हा.
- विद्यार्थिनी इतर कुठल्याही शिष्यवृत्तीचा वा शासनाच्या योजनेचा लाभ घेत नसावी.
- केवळ मान्यताप्राप्त विद्यापीठ आणि संस्थामधील अभ्यासक्रमाकरिता शिष्यवृत्ती देण्यात येईल.
- महाविद्यालयाची प्रवेश प्रक्रिया विद्यार्थिनी व पालकांनी पूर्ण करावयाची आहे.

### आवश्यक कागदपत्रे :

- पासपोर्ट साईझ फोटो
- १० वी, १२वी, व इतर उत्तीर्ण परीक्षांचे गुणपत्रक व प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती.
- पालकांच्या उत्पन्नाचा दाखला.
- रहिवासी दाखला (लाईट बिल/ रेशनकार्ड / निवडणूक ओळखपत्र इ.)
- उच्च शिक्षणासाठी इच्छुक गरजू विद्यार्थीनींनी त्यांचा अर्ज आवश्यक कागदपत्रांसह दि. ३० मे २०१६ पर्यंत खालील पत्त्यावर पोस्टाने अथवा कुरिअरने पाठवावा.

### पात्र अभ्यासक्रम :

**शिष्यवृत्ती करिता पात्र अभ्यासक्रम :** ▸ डिग्री ▸ डिप्लोमा ▸ पदव्युत्तर ▸ बी.एड. ▸ एम. एड. ▸ फार्मसी (एम.फार्म./बी. फार्म.) ▸ पॅरामेडिकल ▸ डी.एम.एल.टी. ▸ नर्सिंग ▸ आय.सी.डब्लू.ए.आय ▸ सी.ए. ▸ सी.एस. ▸ एम.बी.बी.एस. ▸ एम.डी. ▸ एम.एस ▸ आर्किटेक्चर व टाऊन प्लानिंग ▸ हॉटेल मॅनेजमेंट ▸ एम.बी.ए. ▸ एम.एम.एस. ▸ बी.टेक. (ॲग्रीकल्चर) ▸ बी.डी.एम.एस. ▸ एम.सी.ए. ▸ इंजिनिअरींग (बी.ई./एम.ई./बी.टेक./ एम.टेक.) इ.

www.mediaexhibitors.com

/tainwalafoundation

**तैनवाला फाऊंडेशन,** द्वारा सॅमसोनाईट साउथ एशिया प्रा. लि. मु.पो. गोंदे (दुमाला), ता. इगतपुरी, जि. नाशिक – ४२२ ४०३ । संपर्क : **9881096316 I 8600003460**